# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.08.2025** **वारःशनिवार**

1. 15 व्या भारत-जपान शिखर परिषदेच्या अनुषंगानं विविध क्षेत्रात करार; जागतिक शांततेसाठी दोन्ही देशात भागीदारी आवश्यक -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत राज्याचे विविध कंपन्यांशी 34 हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक करार; 33 हजार रोजगार निर्मितीची अपेक्षा
3. राष्ट्रीय क्रीडा दिन राज्यात अनेक उपक्रमांनी साजरा; राज्य सरकारच्या 'मिशन लक्ष्यवेध' या महत्वाकांक्षी योजनेचा पुण्यातून प्रारंभ आणि
4. राज्याच्या विविध भागात पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**पंतप्रधान-जपान**

आगामी 10 वर्षांत जपानकडून भारतात 10 ट्रिलियन येन गुंतवणुकीचं उद्दिष्ट दोन्ही देशांनी ठेवलं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. मेक इन इंडिया आणि मेक फॉर द वर्ल्डसाठी जपानी कंपन्यांनी भारतात यावं असं आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केलं. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्यासमवेत त्यांनी काल टोकियो इथं 15व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला. त्यानंतर संयुक्त वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत आणि जपानने पुढच्या दशकासाठी एक विकास आराखडा तयार केला आहे. यात गुंतवणूक, नवोन्मेष, आर्थिक सुरक्षा, तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्यावर भर असेल, असं मोदी म्हणाले. जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारत आणि जपानमधील भागीदारी आवश्यक आहे, यावर दोन्ही देशांचं एकमत असल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं. या परिषदेदरम्यान दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. या निमित्तानं दोन्ही देशांनी अनेक करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या.

**गुंतवणूक-करार**

गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत काल 17 सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांमधून 33 हजार 768 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक राज्यात होणार आहे; त्याद्वारे राज्यात 33 हजार 483 रोजगारनिर्मिती होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक बसेस आणि ट्रक्स, संरक्षण तसंच अन्य विविध क्षेत्रांचा समावेश आहे. यातून उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**जरांगे-मुख्यमंत्री**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी काल सकाळी मुंबईत आझाद मैदानावर उपोषण सुरु केलं. जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मुंबई पोलिसांनी आणखी एक दिवस वाढवून दिला आहे. मराठा

आरक्षणाच्या मुद्यावर कोणालाही नाराज न करता, चर्चेतून, संवैधानिक पद्धतीनं आणि न्यायालयात टिकेल, असं आरक्षण देऊ, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. सरकारनं या प्रकरणी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन केली आहे. ती समिती सरकार आणि आंदोलकांशी चर्चा करुन प्रस्ताव सादर करेल. तोपर्यंत संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागेल अशाप्रकारे कुणी वागू नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. तर मराठ्यांना आरक्षण मिळेपर्यंत कायदेशीर आणि लोकशाही मार्गानं आंदोलन सुरू ठेवणार असल्याचा निर्धार आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी वार्ताहर परिषदेत व्यक्त केला.

**ऊर्जा कार्यक्षमता**

महाराष्ट्रानं देशात ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली असल्याचं केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांकातून स्पष्ट झालं आहे. या निर्देशांका अंतर्गत इमारत बांधणी, उद्योगक्षेत्र, सेवा, वाहतूक, कृषी, वीज वितरण कंपन्या या प्रमुख क्षेत्रांसह विविध 66 मानकांच्या आधारे मूल्यमापन केलं जातं. महाराष्ट्राबरोबरच आंध्र प्रदेश, आसाम आणि त्रिपुरा या राज्यांनीही ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे.

**क्रीडादिन**

हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त काल देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. राज्यभरातही विविध ठिकाणी या निमित्तानं भरगच्च कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. क्रीडा दिनाचं औचित्य साधत आंतरराष्ट्रीय, आशियाई तसंच राष्ट्रीय पातळीवरील विशेष कामगिरी करणाऱ्या राज्यातल्या खेळाडूंना रोख पारितोषिक देण्यासाठी 28 कोटी 68 लाख रुपयांच्या निधीला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे.

पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील 331 पदक विजेत्यांचा सन्मान करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेलं 22 कोटी रुपयांचं रोख बक्षिसं म्हणजे खेळाडूंच्या कष्टाला दिलेली दाद आहे, असं अजित पवार यावेळी म्हणाले. याच कार्यक्रमात वार्षिक 160 कोटी रुपये खर्च असलेल्या 'मिशन लक्ष्यवेध' या महत्वाकांक्षी योजनेचाही प्रारंभ झाला. पहिल्या टप्प्यात ॲथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, भारोत्तोलन, रोईंग आणि लॉन टेनिस या सहा क्रीडा प्रकारांना प्राधान्य देण्यात आलं असून संबंधित खेळाडूंना उच्च दर्जाचं प्रशिक्षण, आधुनिक उपकरणे आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांची मदत देण्यात येईल.

केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया-साईच्या परिसरात खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र कायम चमकदार कामगिरी करत असल्याबद्दल खडसे यांनी क्रीडापटूंचं कौतुक केलं. कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, सांगलीसह विविध जिल्ह्यांमध्येही काल क्रीडा दिनानिमित्त कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**मोहोळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया आणि खेलो इंडिया ही क्रीडा चळवळ सुरू केली. त्याला आणखी बळ देण्यासाठी खासदार क्रीडा महोत्सव सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात केली. या महोत्सवांतर्गत 33 क्रीडा प्रकारामध्ये खेळल्या जाणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धा नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात होणार असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं. ते म्हणाले.....

**आज फिट इंडिया आणि खेलो इंडिया यासारख्या खूप महत्त्वाच्या उपक्रमावरती भर दिलेला दिसतो. आणि म्हणून आज मागच्या काही काळामध्ये आपण जर पाहिलं तर क्रीडा क्षेत्रामध्ये सुद्धा आपल्या देशानं मोठ्या मोठ्या स्पर्धांमध्ये आपल्या देशानं खूप चांगल्या प्रकारची मागच्या अकरा दहा अकरा वर्षांमध्ये आपण पाहतो. खूप मोठी प्रगती केली खूप चांगल्या प्रकारचे खेळाडू या देशाचं नाव खूप मोठं आहे. आणि म्हणून माननीय प्रधानमंत्र्यांनी हा विचार केला की या देशामध्ये आता प्रत्येक लोकसभेमध्ये त्या त्या ठिकाणच्या लोकसभा सदस्यांनी आज सांसद खेल महोत्सव आयोजित केला पाहिजे आज फिट इंडिया च्या माध्यमातून आमचा देश हा अत्यंत बलवान झाला पाहिजे सशक्त झाला पाहिजे आणि त्यासाठी खेळाची जोड दिली आणि खेलो इंडिया सारख्या सुद्धा उपक्रमाला खूप मोठ्या प्रमाणात चालना देशात मिळावी लागली.**

**अमित शहा**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आजपासून दोन दिवस मुंबई दौऱ्यावर आहेत. काल रात्री त्यांचं मुंबईत आगमन झालं. दोन दिवसांच्या मुंबई भेटीत शहा लालबागचा राजा तसंच अन्य काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणेशाचं दर्शन घेणार आहेत.

**सुपारीगणपती**

वाशिमच्या कारंजा तालुक्यातील कामरगाव इथं जय भवानी जय शिवाजी शेतकरी गणेश मंडळानं सुपारीपासून चार फूट उंचीची गणेश मूर्ती साकारली आहे. या पर्यावरणपूरक मूर्तीसाठी 9 किलो सुपारी वापरण्यात आली. याबाबत अधिक माहिती देताना मूर्तिकार गजानन राउतकर म्हणाले......

**जय भवानी मंडळमधले शेतकरी सगळे मुलं आहे आणि आम्ही दरवर्षी पर्यावरणपूरक मूर्ती बनवायचा आमचा उद्देश आहे आणि त्याचप्रमाणे आम्ही यावर्षी सुपारीचा गणपती बनवलेला आहे सर्व शेतकरी मुलांनी एक किलो अर्धा किलो अशा सुपाऱ्या आणून दिलेल्या आहे आणि आम्ही हे मूर्ती साकार केलेली आहे माझा हाच उद्देश आहे. की सर्व मंडळांनी पर्यावरणपूरक मूर्तीच बनवावी आणि कमीत कमी खर्चात आपल्या मंडळाचं बी आर्थिक मदत करावी आणि पर्यावरणपूरक मूर्तीच बनवावी**

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात कालही पावसाचा जोर कायम होता. नांदेड जिल्ह्यात गुरुवारी रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे गोदावरी, मानार, लेंडी, पैनगंगा, मांजरा या नद्यांना मोठा पूर आला आहे. जिल्ह्यात पाच हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्व पूर परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. बचाव कार्यासाठी लष्करी तुकडीलाही पाचारण करण्यात आलं आहे.

दरम्यान नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी काल जिल्ह्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेतला. गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तत्काळ पूर्ण करुन अहवाल शासनाकडे सादर करावा, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

लातूर जिल्ह्यातील 10 पैकी 8 तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील 66 रस्ते आणि पूल प्रभावित झाले होते. मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून स्थानिकांना खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यात सततच्या पावसामुळे शेतपिकांचं मोठं नुकसान झालं असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी काल नुकसानग्रस्तगावांना भेट देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. दरम्यान माजलगाव प्रकल्पातून काल रात्रीपासून सिंधफणा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे; त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सोलापूर, सांगली आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या अनेक भागात काल जोरदार पाऊस झाला. या पावसाचा फटका खरीप पीकांना बसत असून शहरातील जनजीवनही विस्कळीत झालं आहे.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट माध्यांवर देखील मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.